admn 20-21


MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com    संकेतस्थळ : www.mcaer.org    दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/९e२०/२१२५    दि.११ डिसेंबर,२०२०

## परिपत्रक

**विषयः- सर्व शासकीय, अनुदानित आणि खाजगी विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसंदर्भात मार्गदर्शन मिळण्यासाठी सुविधा केंद्र सुरु करणेबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी व संलग्न महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राबविण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ची प्रवेश प्रक्रिया दि. ९/१२/२०२० पासून सुरु झालेली असून दि. २५/१/२०२१ पर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरु राहणार आहे. या कालावधीत ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करणे, प्रवेश अर्जात विविध महाविद्यालयांचे पर्याय देणे, गुणवत्ता याद्या, प्रवेश वाटप, व इतर प्रवेश प्रक्रियेंतर्गत विविध बाबींसंदर्भात मार्गदर्शन मिळण्यासाठी प्रवेशोच्छुक विद्यार्थी व त्यांचे पालकांकडून विचारणा होत आहे.

ही बाब विचारात घेऊन चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व शासकीय, अनुदानित आणि खाजगी अनुदानित महाविद्यालयांच्या सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांना सूचित करण्यात येते की, प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी व त्यांचे पालक यांना मार्गदर्शन करण्यासाठी आपल्या महाविद्यालयात सुविधा केंद्र सुरु करण्यात यावे. यामुळे प्रवेश प्रक्रिया सुलभरीतीने पार पाडण्यास मदत होईल.

तात्काळ कार्यवाहीस्तव.

कौसडी.
(हरिहर कौसडीकर)
संचालक (शिक्षण)

प्रति,

कृषी विद्यापीठांतर्गत शासकीय, अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य

प्रतः-

१. मे. मिटू स्किलोजिस्, दुसरा मजला, रत्नतारा कॉम्प्लेक्स, क्रांती चौक, नवी सांगवी, पुणे ४११०४७ यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.
२. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ यांना माहितीसाठी सविनय सादर...
३. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी यांना माहितीसाठी.